स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# —: प्रेसनोट :—

दिनांक:— ०८/०६/२०२२

**यातील फिर्यादी यांच्या पाणी कनेक्शन अर्जास मंजूरी देण्याकरीता आरोपीत लोकसेवक व खाजगी इसमाने लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन ती स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २९/२०२२ |
| कलम | कलम ७, ७ (अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | १) सच्चिदानंद विश्वनाथप्पा कोरे, वय ४१ वर्षे, पद—दुय्यम अभियंता, पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मालाड (प), मुंबई.<br>२) सलीम मेहबूब अलमेलकर, वय ६१ वर्षे, इस्टेट एजंट |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,००,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १) आलोसे क्र.१ यांनी स्विकारलेली रक्कम रु. ८०,०००/—<br>२) आरोपी क्र.२ खाजगी इसम यांने स्विकारलेली रक्कम रु.२०,०००/— |
| हस्तगत लाचेची रक्कम | रु. १,००,०००/— |
| थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांनी त्यांचे मालकीच्या मोकळया प्लॉटवर नवीन बंगल्याचे काम चालू केले होते. सदरचे काम चालु झाल्यावर फिर्यादी यांनी दिनांक ०६/०६/२०२२ रोजी महानगरपालिका पी/उत्तर विभाग कार्यालयात पाणी कनेक्शनकरीता अर्ज केला होता. दिनांक ०७/०६/२०२२ रोजी तक्रारदार हे सकाळी मॉर्निंग वॉक करीत असतांना, त्यांचे परिचयाचे व त्यांच्याच विभागात राहणारे यातील आरोपी क्र. २ खाजगी इसम यांनी फिर्यादी यांना, त्यांनी पाणी कनेक्शनकरीता केलेल्या अर्जाबाबत विचारणा करुन लिगल अर्जासोबत रु. १,००,०००/— देण्यास सांगितले. फिर्यादी यांना वरील नमुद आरोपीत लोकसेवक व खाजगी इसमास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०७/०६/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहून आरोपीत लोकसेवक व खाजगी इसम यांचे विरोधात लेखी तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीनुसार दिनांक ०७/०६/२०२२ रोजी पडताळणी दरम्यान आरोपीत लोकसेवक सच्चिदानंद विश्वनाथप्पा कोरे यांनी फिर्यादी यांचेकडुन रु. ८०,०००/— रक्कमेची लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार सापळा कारवाई दरम्यान आरोपीत लोकसेवकास फिर्यादी यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. तसेच यातील खाजगी इसम सलीम मेहबूब अलमेलकर यांनीही उर्वरीत रु. २०,०००/— रक्कमेची लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार सापळा कारवाई दरम्यान त्यांना फिर्यादी यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून आरोपीत लोकसेवक व खाजगी इसम असे दोघांना अटक करुन त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

08/06/2022

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८

वेबसाईट :— acbmaharashtra.gov.in,ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in

ईमेल :— addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, फेसबुक :— www.facebook.com - Maharashtra ACB

मोबाईलअॅप :—www.acbmaharashtra.net

Scanned with CamScann